# प्रकरण २ रे

## सकाळ वृत्तपत्र दैनिक ॲग्रोवनची कृषीपत्रकारिता

२.१ प्रस्तावना

२.२ ॲग्रोवन

२.३ ॲग्रोवनचे स्वरुप

२.४ ॲग्रोवनचे सामाजिक उपक्रम

२.५ समारोप-

# प्रकरण २ रे

## सकाळ वृत्तपत्र दै. ॲग्रोवनची कृषीपत्रकारिता

### २.१ प्रस्तावना:

डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी १ जानेवारी १९३२ ला पुण्यात 'सकाळ' ची सुरुवात केली. विश्वासार्ह, निष्पक्ष आणि सामाजिक बांधीलकी जपणारे वृत्तपत्र हे ब्रीदवाक्य कायम ठेऊन, काळानुसार बदल करीत १ जानेवारी २००६ ला ७५ व्या (अमृतमहोत्सवी) वर्षात पदार्पण केले. गेल्या ७४ वर्षात वाचकांचा विश्वास व प्रेम संपादन करीत 'सकाळ' ने महाराष्ट्रभर जाळे पसरले. यामुळेच सद्य:स्थितीत हा महाराष्ट्रातील महत्वाचा वृत्तपत्रसमूह आहे. दैनिक 'सकाळ' बरोबरच साप्ताहिक सकाळ (१९८७), महाराष्ट्र हेरॉल्ड (१९६३) गोमंतक (१९६२), गोमंतक टाईम्स (२०००), www. esakal.com (२०००), ॲग्रोवन (२००५) ही प्रकाशने प्रकाशित केली जातात. पुण्यातून चार पानांत प्रसिध्द होणारे हे वृत्तपत्र पुणे, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद व सोलापूर येथून उपआवृत्यांसह प्रसिध्द होत आहे. व्यवस्थापकीय संपादक संचालक प्रतापराव पवार हेच सध्या या वृत्तपत्रसमूहाचे सर्वेसर्वा आहेत.

वृत्तपत्र क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाचा स्विकार करुन त्यानुसार कामकाजात संगणकातील स्मार्ट फ्लो, एसएपी (SAP), सिक्स सिग्मा या आधुनिक कार्यप्रणालींचा वापर केला आहे. या कार्यप्रणालींच्या वापरामुळे कामकाजात वेळेच्या बचतीसह अचूकता, पारदर्शकता याला प्राधान्यक्रम मिळाला आहे. 'सकाळ'ने छपाईसाठी ताशी ४५ हजार प्रती अशा वेगाने छपाई करणाऱ्या 'न्यूजलाईन-४५' या मशीनचा वापर केला आहे. 'सकाळ' मधून आठवड्याला सप्तरंग, युवा सकाळ, मधुरा, स्मार्ट सोबती, फॅमिली डॉक्टर, बालमित्र या पुरवण्या प्रसिध्द केल्या जातात. तसेच मधुरांगण, सकाळ नाट्यवाचन समिती, इंडिया फाऊंडेशन, सकाळ रिलीफ फंड, सकाळी भाजीपाला समिती, न्यूजपेपर इन एज्युकेशन

(एनआयई), सकाळ कीर्तन प्रसार सभा, बालकुमार चित्रकला स्पर्धा हे सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. याबरोबरच कुलगुरुंची परिषद (एज्युकॉन), वास्तू प्रदर्शन, शॉपिंग प्रदर्शन, आरोग्यविषयक मार्गदर्शनपर प्रदर्शन, अर्थविश्व व गीत रामायण या कार्यक्रमांचे आयोजन केले. सकाळ वृत्तसमूहाचा वाढता विस्तार व विकास लक्षात घेतल्यास हा समूह रेडिओ, दूरचित्रवाणी, शैक्षणिक वाहिनी यामध्येही पुढाकार घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. 'सकाळ'ची काही खास वैशिष्ट्ये आहेत. यात उत्तम तंत्रज्ञान, आकर्षक मांडणी, सोपी भाषा, आधुनिक व्यवस्थापन, सामाजिक जबाबदारी, नवे तंत्रज्ञान, विविध विषयानुसार पुरवण्यांचा समावेश होतो. या वैशिष्ट्यांमध्ये विशेष भर म्हणजे शेती विषयाला वाहिलेल्या दैनिक 'ॲग्रोवन' ची सुरुवात होय. दैनिक 'ॲग्रोवन' ने शेतीविषयक विविध विषयांना स्थान देऊन विशिष्ट वाचकवर्ग मिळविला आहे.

'सकाळ' ची पुणे (१ जानेवारी १९३२), कोल्हापूर (१ ऑगस्ट १९८०),नाशिक (१७ मार्च १९८९), मुंबई (२८ जानेवारी १९९५), औरंगाबाद (९ जून १९९९), नागपूर (१० मार्च २००३), जळगांव (१ ऑगस्ट २००४), ही प्रकाशनस्थळे आहेत. या ठिकाणाहून विविध आवृत्त्या प्रकाशित होतात.

## २.२ ॲग्रोवन :

प्रसारमाध्यमांचे, विशेषतः वृत्तपत्रांचे स्वरुप भावी काळात बदलणार, फायद्याची गोष्टच रुचणार, केंद्रित विषयावरील माहिती वाचण्याकडे कल वाढणार याकडे 'सकाळ' च्या संचालकांनी लक्ष वेधले. त्यानुसार एक पाहणी झाली. त्यातूनच 'शेती' सारख्या उपक्षित विषयावर एखादे केंद्रित प्रकाशने काढावे, असा मंत्र 'मॅट्रिक कन्सल्टन्सी' कडून मिळाला. त्यानंतर नियोजित वाचकांच्या आवडीचे विषय जाणण्यात आले. दोन कृषी प्रदर्शनातून प्रत्यक्ष २० हजार शेतकऱ्यांशी बोलून वाचकांच्या आवडीचे विषय निश्चित झाले. यानुसार शेती केंद्रित दैनिक सुरु करण्याचा निर्णय संचालक अभिजीत पवार यांनी घेतला.

२० एप्रिल २००५ ला 'ॲग्रोवन' चा पहिला अंक प्रसिध्द झाला. 'ॲग्रोवन' हे

देशातील पहिले कृषी दैनिक आहे. पुणे येथे केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते व राज्याचे कृषिमंत्री बाळासाहेब थोरात, ज्येष्ठ साहित्यिक ना. धों. महानोर, 'सकाळ' चे व्यवस्थापकीय संचालक- संपादक प्रतापराव पवार, संचालक- अभिजीत पवार, तत्कालीन संचालक- सरव्यवस्थापिका- विजया पाटील, 'ॲग्रोवन' चे संपादक- निशिकांत भालेराव, 'सकाळ' चे संपादक (मल्टिमिडीया) संजीव लाटकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन झाले. 'ॲग्रोवन' ची निर्मिती ही शास्त्रशुद्ध पायावर झाली आहे. ग्रामीण भागातील वाचकवर्ग लक्षात घेऊन अंकांची मांडणी, रचना, टाईप केला आहे. शेतीचे नेमके प्रश्न, त्याच्याशी निगडित मशागत, लागवडीचे तंत्र, बाजारपेठ, पूरक उद्योग, पाण्याचे नियोजन, प्रक्रिया उद्योग, कृषी तंत्रज्ञान, आधुनिक अवजारे, किफायतशीर बाजारपेठेत कसा शिरकाव करावा, फळ-भाजीपाला, सुगंधी-औषधी वनस्पती, कट-फ्लॉवर्सचे उत्पादन, दूध आणि पशुपालन, वनशेती, नव्या वाणांची माहिती, कीटकनाशकांची फवारणी, खतांची नेमकी मात्रा याबद्दल कृषी तंज्ज्ञांचा सल्ला, शेतीमालासंदर्भात व्यापारी, कृषी उद्योजकांचे मार्गदर्शन, यशोगाथा, मार्केटिंगचे तंत्र या विषयांची मांडणी केली आहे. तसेच कृषीसंबंधी बातम्या व महत्वाचे म्हणजे पुढील ७२ तासांचा हवामानाचा अंदाज, त्यानुसार कृषी सल्ला तसेच देशातील प्रमुख बाजारपेठा आणि राज्यातील २० बाजार समित्यांमधील समग्र बाजारभाव दररोजच्या अंकात प्रसिध्द केला जातो. दैनिक ॲग्रोवन चे वाचक महाराष्ट्रात २४००० आहेत.

## २.३ 'ॲग्रोवन'चे स्वरुप:

दैनिक 'ॲग्रोवन' हे सोळा पानी वृत्तपत्र आहे. यातील सोळा पानांना स्वतंत्र नावे देण्यात आली असून, त्यानुसार विविध सदरे, लेख, बातम्यांची मांडणी केली जाते. दैनिक 'ॲग्रोवन' चे अंतरंग खालीलप्रमाणे-

**पान एक:** मुख्य पानावर कृषीविषयक महत्वाच्या बातम्या, फोटो असतात. यामध्ये शेतीविषयक धोरणे, निर्णय, विविध घडामोडी, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यपातळीवरील शेतीविषयक बातम्यांना या पानावर स्थान दिले जाते.

**पान दोन:** या पानाला संपादकीय पान म्हणतात. या पानावर संपादकीय लेख 'नवा मुद्दा' या सदरात शेतीविषयक इतर लेख, शेती तज्ज्ञांचे लेख दिले जातात. 'प्रतिसाद' या सदरात वाचकांचा पत्रव्यवहार दिला जातो.

**पान तीन:** 'मऱ्हाटी मुलखात' असे या पानाला नाव दिले आहे. यामध्ये राज्यातील शेतीविषयक सविस्तर व थोडक्यात बातम्या असतात.

**पान चार:** 'प्रदेश' असे या पानाचे नांव आहे. यात राज्यातल्या पान एक वरील उर्वरित बातम्या दिल्या जातात. तसेच शेतकोडे, चकाट्या हा विनोदी किस्सा दिला जातो.

**पान पाच:** 'मऱ्हाटी मुलखात' असे या पानाचे नाव आहे. यामध्ये राज्यातील शेतीविषयक बातम्यांचे जिल्हावार नियोजन केलेले दिसते.

**पान सहा:** 'शिवार' असे या पानाचे नांव आहे. यामध्ये शेतात वेगवेगळी पिके, फळबाग, पिकावरील रोग, कीड नियंत्रण कसे करावे याविषयीचे लेख असतात.

**पान सात:** या पानाला 'डायरी' असे नांव आहे. या पानावर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवरील शेतीविषयक संशोधन, बाजारपेठा, हवामान विषयक बातम्या असतात.

**पान आठ व नऊ:** या पानाला 'विशेष' असे नांव दिले आहे. यात महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातील ज्या शेतकऱ्यांनी शेतीत नवीन पिके घेतली, वेगळे प्रयोग केले, शेतीविषयक कार्यशाळा आणि माहितीपर लेख असतात.

**पान दहा:** या पानाला 'बाजारभाव' असे नांव दिले आहे. हे संपुर्ण पान बाजारभावासाठी दिले आहे. यात देशपातळीवरील दर राज्यानुसार दिले आहेत. महाराष्ट्रातील जिल्ह्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळा-फुलांचे, पालेभाज्या, फळभाज्यांचे दर दिले जातात. या पानावर एखाद्या जिल्ह्यात दरामध्ये विशेष फरक असल्यास तो बातमी स्वरुपात दिला जातो.

**पान अकरा:** या पानाचे 'मार्केट' असे नांव आहे. यात मार्केटसंबंधी सद्यःस्थिती, मार्केटमधील आव्हाने, समस्या, मार्केटमधील खरेदी-विक्री, मागणी यासंबंधीच्या लेखांचा समावेश आहे.

**पान बारा:** 'गजरा' असे या पानाला नांव आहे. यात अक्षरधन, माहीत आहे?, भारत

म्हणजे..., मानबिंदू, गावाकडून शहराकडे, इंग्रजी शिकू या, शब्द शोध अशा सदरात व्यक्तिमत्व कथा, प्रबोधनात्क गोष्टी, सामान्य-ज्ञान, इंग्रजी व मराठी शब्दांचे अर्थ दिले आहेत.

**पान तेरा:** 'घर-दार' असे या पानाचे नांव आहे. यात बाल विज्ञानकथा, अनोखे प्रयोग, नवसाक्षरांसाठी... अशा सदरांचा समावेश आहे.

**पान चौदा:** या पानाला 'ॲग्रोगप्पा' असे नाव दिले आहे. या पानावर वाचकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. कृषिसल्ला, भविष्य, पंचांग, हवामान, कृषी सल्ल्यावर आधारित लेख दिला जातो.

**पान पंधरा:** 'खळं' असे या पानाला नाव दिले आहे. यामध्ये संस्था परिचय, नवे तंत्रज्ञान, योजना, प्रक्रिया तंत्र, पशुधन असे माहितीपर लेख दिले जातात.

**पान सोळा:** या पानाला 'घडामोडी' असे नाव दिले आहे. या पानावर राजकीय, क्रिडा, सहकार, गुन्हे वृत्त व इतर बातम्यांना स्थान दिलेले पहावयास मिळते.

## २.४ 'ॲग्रोवन' चे सामाजिक उपक्रम:

सकाळ वृत्तसमूहाचे दैनिक 'ॲग्रोवन' हे एक प्रकाशन असल्यामुळे 'ॲग्रोवन' नेही सामाजिक उपक्रमावर भर दिला आहे. शेतीविषयक धोरणं, निर्णय, अभ्यास, जागतिक परिस्थितीची माहिती, विविध पिकांविषयी माहिती देण्याच्या दृष्टीकोनातून विशेष कार्यक्रम, मेळावे, प्रदर्शने, मार्गदर्शन शिबिरांच्या माध्यमांतून परस्पर संवाद घडवून आणतात.

१. प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांसाठी इस्त्राईलमध्ये कृषी प्रदर्शन भरविले जाते. गार्डियन हॉलिडेज कंपनी आणि दै. ॲग्रोवन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना इस्त्राईलला प्रदर्शनासाठी नेले जाते.

२. ॲग्रीकल्चर कॉलेज , शेतीविषयक कंपन्या आणि ॲग्रोवन मिळून शेती प्रश्नांवर व्याख्याने, कार्यशाळा जिल्हा पातळीवर वर्षातून २ ते ३ वेळा आयोजित केली जाते.

३. शेती संबंधी इतर कार्यक्रमांमध्ये ॲग्रोवन संयोजन देते.

४. पुणे शहरात कृषी प्रदर्शने आयोजित केली जातात.

## २.५ समारोप-

दै. ॲग्रोवन हे देशातील पहिले कृषी दैनिक आहे. ते फक्त महाराष्ट्रात प्रसिध्द होत आहे. भविष्यात संपुर्ण देशात सुरु करण्याचे प्रयत्न आहेत. त्यानुसार पंजाब, गुजरात, राजस्थान येथे सर्वे करण्याचे काम सुरु आहे.

## संदर्भ


१. www.̇ agrowon.com

२. संपादक भालेराव निशिकांत यांची मुलाखत : दैनिक ॲग्रोवन
पुणे कार्यालय भेट
११ नोव्हेंबर २००७.

३. पत्रकार चौगले राजकुमार यांची भेट : सकाळ कोल्हापूर कार्यालय,
८जानेवारी २००८

४. दैनिक सकाळ (कोल्हापूर) : कार्यालय भेट